महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८६ /२०२३ दि. ०६/११/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत डोंबिवली पूर्व परिसरातील बाजीप्रभू चौक, फडके रोड, मदन ठाकरे चौक, गणपती मंदिर, आप्पा दातार चौक येथे **'दिपावली'** सणानिमित्त दि. ११/११/२०२३ रोजी संध्याकाळी १६:०० ते दि. १२/११/२०२३ रोजी दुपारी १५:०० वा. पावेतो **'दिवाळी पहाट'** आणि **'दिपावली पूर्व संध्या'** असे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सदर कार्यक्रमाचे वेळी बहुसंख्य नागरिक कार्यक्रमास सहभागी होतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) फडके रोडवरील बाजप्रभू चौक कडून आणा दातार चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **फडके रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने नेहरू रोड मार्गे स्टेशनकडे जातील. तसेच फडके रोडकडे येणारी वाहने टिळक रोड, सावरकर रोड, इंदिरा चौक मार्गे स्टेशन कडे जातील.

सदर अधिसूचना दि. ११/११/२०२३ रोजी संध्याकाळी १६:०० ते दि. १२/११/२०२३ रोजी दुपारी १५:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहार
मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, कल्याण

CamScanner

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—३, कल्याण
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner